महाराष्ट्र शासन
शासकीय अध्यापक महाविद्यालय,नांदेड
स्वातंत्र्य सैनिक सोसायटी, शोभा नगर जवळ, नांदेड
Principal: Dr.Urmila M. Dhoot Web: www.gcenanded.co.in Email: gcenanded@gmail.com
कार्यालय – (02462) 222220 प्राचार्य कक्ष :(02462) 224523 प्राचार्य निवास (02462) 256006

शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये शिष्यवृत्तीबाबत मार्गदर्शक तत्वे (Guidelines for Scholarship)

i) विद्यार्थ्यांकरीता महत्वाची सुचना

1. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरताना साधारणत: उत्पन्न प्रमाणपत्र, महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र , जातीचा दाखला, मुळ टि.सी. इत्यादी कागदपत्रे आवश्यक असतात.
2. शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमाकांचा वापर करुन अर्ज भरता येतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधारक्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे.
3. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी – शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
4. विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरीता सादर करावी.
5. ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालयाच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात यावेत.

ii) महाविद्यालयाने करावयाची कार्यवाही (मदत)

1. शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणा-या अडचणींचे निराकरण करणे साठी महाविद्यालयांने विद्यार्थ्यांस संगणक, प्रिंटर, इंटरनेट इत्यादी सेवा नि:शुल्क उपलब्ध करुन दिलेली आहे.
2. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला इ.) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसीलदार/उपविभागीय कार्यालयात विद्यार्थ्यांना येणा-या अडचणी

दूर करणे साठी महाविद्यालयाकडून प्रयत्न केले जातात. महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करण्यात येते. तसेच संबंधित विद्यार्थ्यांने अर्जामध्ये भरलेली (अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार, अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती, टक्केवारी, शिष्यवृत्ती लाभ इ. काळजीपूर्वक पडताळणी करण्यात येते)

3. महाविद्यालयाच्या लिपीक त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही (Approve/Reject/Sent Back) करतो. महाविद्यालयाच्या लिपिकांनी मंजूर केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर पाठवितो.
4. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपिकांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने (Approve/Reject/Sent Back) कार्यवाही करतात.
5. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होताच शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरून घेऊन पात्र अर्ज तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज संबंधित विभागकडे विहित कालमर्यादेत सादर करतात.
6. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणा-या अडचणींचे समाधान महाविद्यालयातील शिष्यवृत्ती नोडल अधिकारी तात्काळ करतात.
7. विद्यार्थिनीना, मुलींना मोफत शिक्षण योजनेची सविस्तर माहिती देण्यात येते. विद्यार्थीनीकडून नियमानुसार जास्तीत जास्त अर्ज भरुन घेण्यात येतात. कोणतीही विद्यार्थिनी सदर शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही यांची दक्षता घेण्यात आलेली आहे.

डॉ.उर्मिला मुरलीधर धूत
प्राचार्य
शासकीय अध्यापक महाविद्यालय
नांदेड

Principal
Govt.College of Education
Nanded